नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २११ Issue - 211 | वार बुधवार दि. १८ डिसेंबर २०२४ Blow- Wednesday Date 18 December 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# वन नेशन, वन इलेक्शन विधेयक लोकसभेत सादर

## विधेयकावरील मतदानासाठी भाजपचे २०हून अधिक खासदारांची दांडी

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नवी दिल्ली: लोकसभेत मंगळवारी एक देश, एक निवडणूक विधेयक सादर करण्यात आले. केंद्रीय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी सभागृहात १२९वे संविधान दुरुस्ती विधेयक सादर केले. सभागृहात उपस्थित असलेल्या अनेक पक्षांच्या सदस्यांनी त्यावर आक्षेप घेतल्यानंतर मतदान घेण्यात आले. विधेयक मंजूर होण्यासाठी ३०७ मतांची गरज होती. मात्र प्रत्यक्षात २६९ मते मिळाली आणि विरोधात १९८ मते पडली.

हे विधेयक सादर करण्याआधी भाजपने सोमवारी पक्षाच्या सर्व खासदारांना व्हीप जारी केला होता. मात्र पक्षाचे २० हून अधिक खा-सदार लोकसभेत गैरहजर राहिले. या सर्व गैरहजर खासदारांना पक्षाने नोटीस बजावली आहे.



असे म्हटले जाते की- एक देश एक निवडणूक हे मोदींचे फार जुने स्वप्न आहे. असे असताना देखील भाजपचे २० हून अधिक खासदार सभागृहात मतदानाच्या वेळी गैरहजर राहतात हे गंभीर असल्याचे मानले जात आहे. पक्षाने गैरहजर खासदारांना नोटीस बजावली आहे.

सभागृहात या विधेयकाला काँग्रेस, समाजवादी पार्टी, तृणमूल काँग्रेस, तामिळनाडूमधील डीएमके आदी पक्षांनी विरोध केला. त्याच बरोबर उद्धव ठाकरेंची शिवसेना, शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस, माकप सह अन्य छोट्या पक्षांनी देखील या विधेयकाला विरोध केला.

आता हे विधेयक संसदेच्या संयुक्त समिती अर्थात जेपीसी कडे पाठवले जाण्याची शक्यता आहे. या समितीची स्थापना लोकसभेतील प्रत्येक पक्षाच्या संख्याबळाच्या आधारावर केली जाते. सभागृहात भाजपकडे सर्वाधिक सदस्य आहेत त्यामुळे समितीवर त्यांचे जास्त सदस्य असतील आणि समितीचे नेतृत्व देखील त्यांच्याकडे असेल.

काँग्रेस खासदार शशी थरूर यांनीही विधेयकावरील मतदानानंतर सरकारला संख्येतील फरक निदर्शनास आणून दिली. सभागृहाबाहेर बोलताना थरूर म्हणाले, निःसंशयपणे सरकारकडे जास्त संख्याबळ आहे पण ते (संविधान दुरुस्ती विधेयके) मंजूर करण्यासाठी आवश्यक दोन तृतीयांश बहुमत त्यांच्याकडे स्पष्टपणे नाही. त्यामुळे सरकारने याबाबत फार काळ आग्रह धरू नये. नियमांनुसार, संविधानातील या दुरुस्त्या लोकसभेत मंजूर होण्यासाठी उपस्थित असलेल्या आणि मतदानाच्या दोन तृतीयांश सदस्यांच्या समर्थनाची आवश्यकता असेल.



# उद्धव ठाकरेंनी घेतली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

प्रतिनिधी/मुंबई : नागपुरी हिवाळी अधिवेशनात सुरू आहे. आज अधिवेशनाचा दुसरा दिवस आहे. अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी आज माझी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी नागपुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे.

दोन्ही नेत्यांमध्ये पंधरा मिनिटे चर्चा देखील झाली. मात्र नेमकी कशावर चर्चा झाली, हे अद्याप समोर आले नाही विरोधी पक्ष नेते संदर्भात चर्चा करण्यासाठी हे भेट झाल्याची माहिती समोर येत आहे.

गुरुदेव पक्ष नेते संदर्भात चर्चा करण्यासाठी हे भेट झाल्याची माहिती समोर येत आहे.

यावेळी उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांना शुभेच्छा देखील दिल्याची माहिती समोर येत आहे.

दुसरीकडे फडणवीस यांच्या भेटीनंतर लगेचच उद्धव ठाकरे यांनी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची देखील भेट घेतली आहे.

विधानसभेत विरोधी पक्षनेता कोणाचा असावा या संदर्भात ही भेट असल्याची माहिती समोर येत आहे उद्धव यांनी आज अचानक नार्वेकर आणि मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

# जन्मदात्या आईने मुलाची केली हत्या

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

भिवंडी प्रतिनिधी/मिलिंद जाधव : सासू, सुनेच्या भांडणाच्या पर्यावसानात अवघ्या १ वर्षीय बालकाला जीव गमवावा लागल्याची घटना येथील शहापूर तालुक्यातील वासिंद शहरालगतच्या कासणे गावात घडली आहे. घरगुती भांडणातून जन्मदात्या आईनेच पोटच्या मुलाला पाण्याने भरलेल्या टाकीत बुडवून ठार मारल्याने आई अपेक्षा संदेश भोई (२३) हिच्या विरोधात पडघा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलमा नुसार खुनाचा गुन्हा दाखल करून पोलिसांनी आईला अटक केली आहे.. पार्थ असे हत्या झालेल्या दुर्दैवी मुलाचे नाव आहे.

भिवंडी तालुक्यातील पडघा पोलीस ठाण्याच्या हद्दीत कासणे गावात संदेश भोई (वय ३१) यांचे कुटूंब राहते. आरोपी अपेक्षा व संदेश या दाम्पत्याला वर्षभरापूर्वी पार्थ (१) हा मुलगा झाला होता. परंतु त्याला जन्मतःच हृदयविकार असल्याने त्याच्यावर मुंबईतील वाडीया रुग्णालयात उपचार सुरु होते. सासू सोबत झालेल्या भांडणाच्या रागातून ही हत्या झाली आहे.

त्यातच आरोपी अपेक्षा हीची सासू मंगळवारी पार्थ याला घेऊन टिटवाळा येथे नंनदेकडे गेली होती. तेथील हवामान आजारी पार्थला काही मानवले नाही. बदललेल्या हवामानामुळे त्याला ताप आला. म्हणून सासू पार्थ ला घेऊन पुन्हा मंगळवारी रात्री घरी कासणे गावी आले. पार्थ ची प्रकृती बिघडल्यावरुन अपेक्षा व सासूमध्ये रात्री जोरदार भांडण झाले. हे भांडण मिटवून संदेश कामावर गेला होता. त्यानंतर (बुधवार )पहाटे रात्रपाळीवरुन संदेश घरी आला मुलासोबत खेळता खे-ळता गाढ झोपला असतांनाच आई अपेक्षा हिने सर्वांची नजर चुकवून पहाटेच्या सुमारास घराच्या पहिल्या माळ्यावर ५ हजार लिटर पाण्याने भरलेल्या टाकीत पार्थला बुडवू त्याची हत्या केली.

तर पार्थ याच्या मृतदेहावर शह-ापूर उपजिल्हा रुग्णालयात शवचिकित्सा करण्यात आली आहे. या गुन्ह्या प्रकरणी अधिक तपास सुरु असल्याची माहिती पडघा पोलीस ठाण्याचे पो. नि. बाळा कुंभार यांनी दिली असून दोन दिवस पोलीस कोठडी देण्यात आली असून. त्यानंतर

न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे. तर सदर घटनेचा अधिक तपास पडघा पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक डी बी.शिरोळे करीत आहेत.

# विधानपरिषद सभापती पदासाठी भाजपकडून राम शिंदेंना उमेदवारी जाहीर, उद्या भरणार अर्ज



**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

मुंबई : गेल्या अडीच वर्षांपासून रिक्त असलेल्या विधान परिषद सभापतीपदासाठी गुरुवारी निवडणूक होणार आहे. उपसभापती निलम गोऱ्हे यांनी आज विधानपरिषदेच्या सभागृहात या निवडणुकीची घोषणा केली. सभापती पद संपुष्टात येणार आहे. त्यामुळे नियमानुसार, राज्यपालांनी सभापतीपदाच्या निवडणुकीसाठी १९ डिसेंबर २०२४ हा दिवस निश्चित केला आहे.

दरम्यान, महायुतीकडून विधानपरिषद आमदार राम शिंदे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. भाजप पक्षाकडून तशी घोषणा करण्यात आली आहे. उद्या बुधवार सकाळी १० वाजता अर्ज दाखल केला जाणार आहे. त्यांनंतर अर्जाची छाननी करण्यात येणार असून गुरुवारी निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. तर पक्षाने आपली उमेदवारी घोषित केल्याने आमदार राम शिंदे यांनी पक्षश्रेष्ठींसोबतच प्रदेश नेतृत्वाचेही आभार मानले आहेत.

'महाराष्ट्र विधानपरिषद सभापती निवडणूकीसाठी माझी उमेदवारी घोषित केल्याबद्दल देशाचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदी साहेब आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री अजित पवार साहेब त्याचबरोबर देशाचे गृहमंत्री अमित शहा साहेब, भारतीय जनता पार्टी राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डाजी, भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, एनडीएचे आणि महायुतीचे आणि सर्व नेते यांचे मी मनापासून आभार मानतो'

# राज्यात सुरु असलेल्या, प्रस्तावित प्रकल्पांना एडीबीने मोठ्या प्रमाणात अर्थसहाय्य करावे : मुख्यमंत्री

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

प्रतिनिधी/नागपूर : राज्याच्या सर्वांगीण, सर्वसमावेशक आणि गतिमान विकासासाठी महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉरमेशनच्या (चखढठ मित्रा माध्यमातून आरोग्य, ग्रामीण रस्ते वाहतूक, कौशल्य विकास आणि बांबू प्रकल्प या क्षेत्रांवर भर देण्यात आला आहे. या प्रकल्पांची गती वाढविण्यासाठी राज्यात सुरु असलेल्या आणि प्रस्तावित असलेल्या प्रकल्पांना आशियाई विकास बँकेने (उद्ध) मोठ्या प्रमाणात अर्थसहाय्य उपलब्ध करून द्यावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बँकेला केले आहे. ङ्गएडीबीङ्खच्या संचालक मिओ ओका यांनी याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर विधानभवन परिसरातील मंत्रिमंडळ सभागृहात आशियाई विकास बँकेसंदर्भातील विविध विषयांबाबत बैठक झाली.मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, राज्याच्या विकासासाठी ग्रामीण भागाचा वेगाने विकास होणे गरजेचे आहे. त्यामुळे रस्त्यांच्या माध्यमातून एक हजार लोकसंख्येवरील सर्व गावे विकसित भागाशी जोडण्यात यावीत. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे उन्नतीकरण, विषय-शाखांची संख्या वाढविणे आदी माध्यमातून अतिरिक्त ७५ हजार जागा वाढविण्यात याव्यात. नागरिकांच्या आरोग्यावर अधिकाधिक भर देतानाच गर्भाशयमुखाच्या कर्करोगावरील उपचारांवर भर देण्यात यावा. त्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा, लसीचा उपयोग करावा, असे निर्देशही त्यांनी यावेळी सचिवांना दिले. बांबू लागवड अभियानातून शेतकऱ्यांना पूरक व्यवसाय उप-लब्ध करण्याबरोबरच जंगल क्षेत्रामध्ये वाढीसाठी विविध उपाययोजना राबविण्यात याव्यात. त्यासाठी रोपवाटिकांमध्ये बांबू रोपे उपलब्ध करून द्यावीत. मराठवाड्यातील पडीक जमिनीवर मोठ्या प्रमाणात बांबूची लागवड करून जंगल क्षेत्रामध्ये वाढ करण्याचा प्रयत्न करावा. राज्यातील महत्त्वाकांक्षी अभियानांना गती देण्यासाठी मुख्य सचिवांनी प्रमाणित प्रक्रिया (एसओपी) ठरवून द्यावी. अभियानाचा कालावधी, संबंधितांच्या जबाबदाऱ्या याबाबत स्पष्टता ठेवावी, अशा सूचनाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या. या बैठकीस मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी आदी उपस्थित होते.

# रणजीत सिंह मोहिते पाटलांना दणका

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : भाजपचे विधान परिषदेचे आमदार रणजीत सिंह मोहिते पाटील यांना पक्षाने कारणे दाखवा नोटीसा बजावली आहे.

त्यांच्यावर लोकसभे सोबतच विधानसभा निवडणुकीत पक्षविरोधी प्रचार केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे यंदाच्या विधानसभा निकालात भाजपने १३२ जागा जिंकत इतिहास घडवला आहे त्यामुळे विधानसभा निवडणुकीपूर्वी पक्ष सोडून जाणारे पक्षात राहून विरोधकांचा प्रचार करणारे यांची कुंडी झाली आहे.

सोलापुरात रणजितसिंह मोहिते पाटील यांची हकालपट्टी करावी, अशी मागणी माळशिरचे माजी आमदार राम सातपुते यांनी पक्षाकडे केले होते.

लोकसभेत आणि विधानसभा निवडणुकीत मोहिते पाटलांनी पक्षविरोधी काम केल्याचे आर-ोप त्यांनी केला. त्यानंतर आज भाजपने मोहिते पाटलांना कारणे दाखवा नोटीस पाठवली. त्यात पक्षशिस्त भंग करणारे कृत्य वारंवार केल्याचे पक्षाच्या निदर्शनास आले आहे.

लोकसभा निवडणुकीत माढा मतदारसंघातील तिकीट न मिळाल्याने भाजपचे धैर्यशील मोहिते पाटील यांनी बंडखोरी करून राष्ट्रवादी शरदचंद्रजी पवार गटात प्रवेश केला. तू सोला-पूर जिल्ह्यात विशेषता माढा, माळशिरस, अकलूज, या पट्ट्यात मोहिते पाटील घराण्याचे राजकीय वर्चस्व आहे, दहशिल यांच्या उमेदवारीमुळे विजयसिंह मोहिते पाटील यांच्यासह इतरांनी शरद पवार गटात प्रवेश केला मात्र,रणजीत सिंह मोहिते पाटील यांनी उघडपणे राष्ट्रवादी प्रवेश केला नाही पण स्थानिक पा-तळीवर रणजीत सिंह व धैर्यशील मोहिते पाटील यांच्या पाठीशी होते. आता नोटीशीला ते काय उत्तर देतात हे पाहणे महत्त्वाचे आहे.

## इजा बिजा तिजा... सलग तिसऱ्यांदा 'अपमान'

### छगन भुजबळ यांचा संताप

# निर्णय घेताना विश्वासात घेतलं जात नाही : भुजबळ

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नाशिक: मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्यानं नाराज झालेले राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ सध्या नाशिकमध्ये आहेत. नागपूरमध्ये सुरु असलेलं हिवाळी अधिवेशन सोडून ते नाशिकला परतले आहेत. आपल्या कार्यकर्त्यांशी बोलून पुढील भूमिका ठरवू, असं भुजबळ यांनी सांगितलं आहे. त्यामुळे भुजबळ पुढे काय करणार याची उत्सुकता सगळ्यांनाच आहे.

निर्णय घेताना विश्वासात घेतलं जात नाही. शरद पवारांसोबत काम करताना अशी पद्धत नव्हती. त्यावेळी मी निर्णय प्रक्रियेत असायचो. शिवसेना, काँग्रेस, शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेससोबत काम करताना मला कायम विश्वासात घेतलं जायचं, असं म्हणत भुजबळांनी राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवारांच्या कार्यपद्धतीवर थेट भाष्य केलं. नाराज भुजबळ काय करु शकतात, त्यांची नाराजी महायुतीला किती महागात पडू शकते, भुजबळ यांच्यापुढे सध्या काय पर्याय आहेत, हे प्रश्न महत्त्वाचे आहेत.



राज्यात मराठा आंदोलन तापलेलं असताना, मनोज जरांगे महायुती सरकारला लक्ष्य करत असताना त्यांचा थेट समाचार घेण्याची कामगिरी भुजबळांनी केली. त्यांनी ओबीसींचे मेळावे घेत जरांगेंना थेट अंगावर घेतलं. मराठा मतदार महायुतीपासून दुरावलेले असताना भुजबळांनी ओबीसी मतांचं ध्रुवीकरण करण्यात मोलाची भूमिका पार पाडली. त्याचा फायदा महायुतीला झाला. विशेष म्हणजे ओबीसी समाज कायम भाजपसाठी आधार राहिलेला आहे. भाजपचा डीएनए ओबीसी आहे, असं विधान देवेंद्र फडणवीस यांनी काही महिन्यांपूर्वी केलं होतं.

भुजबळ ओबीसींचे मोठे नेते आ-हेत. समता परिषदेच्या माध्यमातून ते ओबीसींचं राजकारण करतात. लढाऊ नेते अशी त्यांची ओळख आहे. पण सध्याची परिस्थिती पाहता त्यांच्याकडे फार पर्याय नाहीत. कधीकाळी शिवसेना सोडून शिवसैनिकांचा रोष ओढवून घेणारे भुजबळ आता राष्ट्रवादी सोडून सत्तेतून बाहेर पडतील का, हा प्रश्नाचं उत्तर नाही असं मिळतं. विरोधकांची सध्याची स्थिती पाहता भुजबळ ते विरोधी पक्षात जाण्याची शक्यता अतिशय कमी आहे.

भुजबळ सहा महिन्यांपूर्वी लोकसभा निवडणूक लढण्यास उत्सुक होते. पण त्यावेळी त्यांना संधी मिळाली नाही. मग त्यांना राज्यसभेवर जायचं होतं. पण त्यांच्याजागी अजित पवारांनी पत्नी सुनेत्रा पवारांना राज्यसभेवर पाठवलं. यानंतर आता भुजबळांना मंत्रिमंडळातून डावलण्यात आलं आहे. सलग तिसऱ्यांदा त्यांचा अपमान झाला आहे. त्यामुळे भुजबळ प्रचंड नाराज आहेत. पण त्यांचं वय आणि अन्य कारणं पाहता ते सत्ताधारी पक्ष सोडतील याची शक्यता कमीच आहे. ते अखेर राज्यसभेचा पर्याय स्वीकारु शकतात. अजित पवार आणि भाजपला त्यांचं उपद्रव्यमूल माहीत असल्यानं त्यांच्याकडून भुजबळांची समजूत काढली जाऊ शकते.

**विधानसभानिवडणुकीचीरणधुमाळी सुरु असताना पत्रकार राजदीप सरदेसाई यांचं एक पुस्तक प्रकाशित झालं. त्यात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पडलेल्या फुटीचा उल्लेख आहे. 'ईडीपासून सुटका झाल्यानं सर्वांनीच सुटकेचा नि:श्वास सोडला. ईडीपासून सुटका हा तर माझ्यासाठी एक प्रकारे पुनर्जन्मच होता,' असं भुजबळ बंडाबद्दल म्हणाले होते, असा उल्लेख पुस्तकात आहे. त्यामुळे भाजपसोबत सत्तेत राहणं भुजबळ यांच्यासाठी किती गरजेचं आहे, ते समजून घेता येईल.**

## संपादकीय....

# नाराजीनाट्य

मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्यानं नाराज झालेले राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ सध्या नाशिकमध्ये आहेत. नागपूरमध्ये सुरु असलेलं हिवाळी अधिवेशन सोडून ते नाशिकला परतले आहेत. आपल्या कार्यकर्त्यांशी बोलून पुढील भूमिका ठरवू, असं भुजबळ यांनी सांगितलं आहे. त्यामुळे भुजबळ पुढे काय करणार याची उत्सुकता सगळ्यांनाच आहे. निर्णय घेताना विश्वासात घेतलं जात नाही. शरद पवारांसोबत काम करताना अशी पद्धत नव्हती. त्यावेळी मी निर्णय प्रक्रियेत असायचो. शिवसेना, काँग्रेस, शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेससोबत काम करताना मला कायम विश्वासात घेतलं जायचं, असं म्हणत भुजबळांनी राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवारांच्या कार्यपद्धतीवर थेट भाष्य केलं. नाराज भुजबळ काय करु शकतात, त्यांची नाराजी महायुतीला किती महागात पडू शकते, भुजबळ यांच्यापुढे सध्या काय पर्याय आहेत, हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. राज्यात मराठा आंदोलन तापलेलं असताना, मनोज जरांगे महायुती सरकारला लक्ष्य करत असताना त्यांचा थेट समाचार घेण्याची कामगिरी भुजबळांनी केली. त्यांनी ओबीसींचे मेळावे घेत जरांगेंना थेट अंगावर घेतलं. मराठा मतदार महायुतीपासून दुरावलेले असताना भुजबळांनी ओबीसी मतांचं ध्रुवीकरण करण्यात मोलाची भूमिका पार पाडली. त्याचा फायदा महायुतीला झाला. विशेष म्हणजे ओबीसी समाज कायम भाजपसाठी आधार राहिलेला आहे. भाजपचा डीएनए ओबीसी आहे, असं विधान देवेंद्र फडणवीस यांनी काही महिन्यांपूर्वी केलं होतं. भुजबळ ओबीसींचे मोठे नेते आहेत. समता परिषदेच्या माध्यमातून ते ओबीसींचं राजकारण करतात. लढाऊ नेते अशी त्यांची आेळख आहे. पण सध्याची परिस्थिती पाहता त्यांच्याकडे फार पर्याय नाहीत. कधीकाळी शिवसेना सोडून शिवसैनिकांचा रोष ओढवून घेणारे भुजबळ आता राष्ट्रवादी सोडून सत्तेतून बाहेर पडतील का, हा प्रश्नाचं उत्तर नाही असं मिळतं. विरोधकांची सध्याची स्थिती पाहता भुजबळ ते विरोधी पक्षात जाण्याची शक्यता अतिशय कमी आहे.

# अल्पसंख्याकांची परवड होता कामा नये !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अल्पसंख्याक लोकांना पुढे आणण्यासाठी आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी हा दरवर्षी १८ डिसेंबर रोजी 'अल्पसंख्याक हक्क दिन' म्हणून देशात साजरा केला जातो. मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, बौद्ध, पारशी आणि जैन हे भारतातील अल्पसंख्याकांमध्ये गणले जातात. यानिमित्त देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. भारतीय राज्यघटनेनुसार देशातील प्रत्येक नागरिकाला समान अधिकार मिळाले पाहिजेत, मग ती कोणतीही जात, धर्म, भाषा किंवा समुदाय असो. देशाच्या संविधानात अल्पसंख्याकांच्या संरक्षणाची तरतूदही आहे. संविधानातील तरतूदीनुसार व कायदेशीरप्रमाणे भारतामध्ये धार्मिक अल्पसंख्याक आणि भाषिक अल्पसंख्याक असे दोन प्रकारचे अल्पसंख्याक समुदाय आहेत. भारतामध्ये राहणाऱ्या व त्यांची वेगळी भाषा व लिपी असणाऱ्या लोकसमूहाला भाषिक अल्पसंख्याक म्हणून गणण्यात येते तर राज्यामध्ये राज्यभाषेव्यतिरिक्त इतर भाषा मातृभाषा असलेल्या लोकसमूहाला भाषिक अल्पसंख्याक म्हणून गणण्यात येते. महाराष्ट्रामध्ये मराठी व्यतिरिक्त अन्य भाषा मातृभाषा असणाऱ्या लोकसमूहाला भाषिक अल्पसंख्याक गणण्यात येते.

केंद्रीय गृहमंत्रालयाने १९७८ मध्ये एक ठराव पारीत केला, ज्यामध्ये अल्पसंख्याक समाजातील लोकांसाठी एक आयोग स्थापन करण्याचे सांगण्यात आले. त्यासोबतच भारतीय संविधानात संरक्षणाचे अनेक कायदे असल्याचेही सांगण्यात आले, असे असूनही अल्पसंख्याकांना असुरक्षित वाटत आहे. एवढेच नाही तर त्यांच्याशी भेदभाव केला जातो, हे संपवण्यासाठी अल्पसंख्याक आयोगाची स्थापना करण्यात आली. यासोबतच १९९२ मध्ये 'राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगा'ने कायदा केला. ज्याअंतर्गत १९९३ ची अधिसूचना आली. ते लोक अल्पसंख्याक समाजात येतात, जे आर्थिक, सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या मागासलेले आहेत. याशिवाय ज्यांची लोकसंख्याही कमी आहे. त्यांची भाषा, धर्म, परंपरा सर्वसामान्य समाजातील लोकांपेक्षा वेगळी असावी. मात्र शेजारील देशातील अल्पसंख्याक निर्वासितांना नागरिकत्व देण्याच्या कायद्याला विरोध करत सर्वोच्च न्यायालयाने नवा निर्णय देत अल्पसंख्याक समुदायाच्या लोकांची व्याख्या स्पष्ट केली आहे. हा निकाल देताना न्यायालयाने म्हटले की, धर्माला मर्यादा नाही. धर्माकडे राज्याच्या दृष्टीने न पाहता अखिल भारतीय पातळीवर पाहिले पाहिजे.

'अल्पसंख्याक' हा शब्द प्रामुख्याने राष्ट्रीय कायदेमंडळातील राजकीय पक्षांना संदर्भित केला जात असे, वांशिक, राष्ट्रीय, भाषिक किंवा धार्मिक गटांना नाही. पॅरिस परिषदेचे श्रेय अल्पसंख्याकांच्या हक्कांची संकल्पना मांडण्यात आले आणि त्याला महत्त्व दिले गेले. १८१४ मध्ये व्हिएन्नाच्या काँग्रेसमध्ये अल्पसंख्याकांच्या हक्कांचा मुद्दा प्रथम उपस्थित करण्यात आला होता, ज्यामध्ये जर्मन ज्यू आणि विशेषत: पुन्हा एकदा फाळणी झालेल्या ध्रुवांच्या भवितव्यावर चर्चा करण्यात आली होती. काँग्रेसने आशा व्यक्त केली की प्रशिया, रशिया आणि ऑस्ट्रिया त्यांच्या अल्पसंख्याकांना सहिष्णुता आणि संरक्षण देतील, ज्यांचा शेवटी त्यांनी दुर्लक्ष केले, संघटित भेदभावात गुंतले.



– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

हंगेरीच्या क्रांतिकारी संसदेने जुलै १८४९ मध्ये प्रथम अल्पसंख्याक हक्कांची घोषणा करुन ती अंमलात आणली. त्यानंतर १८६७ मध्ये ऑस्ट्रियन कायद्यात अल्पसंख्याक हक्क संहिताबद्ध करण्यात आले. तथापि रशियन सरकारने आपल्या खेड्यांमध्ये ज्यूंविरुद्ध होणारे दुष्ट पोग्रोम सहन केले. या धोरणासाठी रशियावर मोठ्या प्रमाणावर हल्ले झाले. याउलट आफ्रिकन वसाहती स्वतंत्र झाल्यापासून दक्षिण युनायटेड राज्यामधील कृष्णवर्णीय लोकांसारख्या इतर अल्पसंख्यांकांच्या वागणुकीबाबत फार कमी किंवा कोणताही आंतरराष्ट्रीय आक्रोश नव्हता. पहिल्या महायुध्दापूर्वी फक्त तीन युरोपीय देशांनी वांशिक अल्पसंख्याकांचे हक्क घोषित केले आणि अल्पसंख्याक-संरक्षणात्मक कायदे लागू केले. पहिला हंगेरी (१८४९ आणि १८६८), दुसरा ऑस्ट्रिया (१८६७) आणि तिसरा बेल्जियम (१८९८) होता. पूर्वीच्या काळात इतर युरोपीय देशांच्या कायदेशीर प्रणालींनी प्राथमिक शाळांमध्ये, सांस्कृतिक संस्थांमध्ये, सार्वजनिक प्रशासनाच्या कार्यालयांमध्ये आणि कायदेशीर न्यायालयांमध्ये युरोपियन अल्पसंख्याक भाषा वापरण्यास परवानगी दिली नाही.

भाजप नेते अश्वनी कुमार यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. यामध्ये जम्मू-काश्मीर आणि ईशान्येकडील राज्यांसह एकूण ८ राज्यांमध्ये हिंदू समाजाच्या लोकांची लोकसंख्या कमी असल्याचे सांगण्यात आले. यामुळे त्यांना अल्पसंख्याकांच्या श्रेणीत ठेवण्यात आले आहे. अशा स्थितीत ना त्यांना सरकारी सुविधा मिळू शकल्या, ना त्यांचे हक्क मिळू शकले. याशिवाय असे विचार टाळायचे असतील तर, या प्रकरणांची न्यायालयातही सुनावणी झाली पाहिजे, असे याचिकेत म्हटले आहे.

अल्पसंख्याक हे धर्म, भाषा, राष्ट्रीयत्व किंवा जात यावर आधारित असतात. तेव्हा संयुक्त राष्ट्राने म्हटले की, अल्पसंख्याकांची संस्कृती, धर्म इत्यादींच्या रक्षणासाठी देशांना पावले उचलावी लागतील, जेणेकरून त्यांचे अस्तित्व धोक्यात येऊ नये. म्हणुन संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने १९९२ मध्ये या दिवसासाठी १८ डिसेंबर निवडला होता. संयुक्त राष्ट्राने उचललेले हे मोठे पाऊल होते. विशेषतः भारताच्या दृष्टिकोनातून, हे लक्षात घेऊन भारतात अल्पसंख्याक आयोगाची निर्मिती करण्यात आली. हा आयोग अल्पसंख्याक लोकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी पावले उचलतो आणि बहुसंख्य लोकांशी समन्वय साधण्याचा प्रयत्न करतो.

राष्ट्रीय अल्पसंख्याकांच्या संरक्षणाच्या क्षेत्रात युरोपियन युनियनची थेट भूमिका अजूनही खूप मर्यादित आहे. सामान्य आंतरराष्ट्रीय कायदे आणि आंतरराष्ट्रीय कायद्याच्या युरोपीय प्रादेशिक प्रणालीवर अवलंबून आहे आणि आवश्यकतेनुसार त्यांचे मानदंड स्वीकारले. पण १९९० च्या दशकात सुरू झालेल्या 'युरोपियन एकात्मतेचे डी-इकॉनॉमायझेशन' ही परिस्थिती बदलत आहे. राष्ट्रीय अल्पसंख्याकांच्या संरक्षणाची राजकीय प्रासंगिकता खूप जास्त आहे. 'अल्पसंख्याक हक्क दिना'निमित्त सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा !

## अल्पसंख्याक हक्क दिन १८ डिसेंबर.....

# अल्पसंख्याक समुदायासाठी प्रशासनाकडून पंतप्रधानाच्या १५ कलमी कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी

पंतप्रधानांचा अल्पसंख्याक समुदायासाठी नवीन १५ कलमी कार्यक्रम हा एक महत्वाकांक्षी उपक्रम आहे, जो विविध अल्पसंख्याक घटकांच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक उन्नतीसाठी राबवला जात आहे. या कार्यक्रमात मुस्लिम, शीख, बुद्धिस्ट, ख्रिश्चन, जैन आणि पारशी या प्रमुख अल्पसंख्याक समुदायांचा समावेश आहे. सोलापूर जिल्ह्यातही प्रशासन अल्पसंख्याक समाजासाठी असलेल्या या १५ कलमी कार्यक्रमाची अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी करून या समुदायातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी प्रयत्नशील आहे.

**१५ कलमी कार्यक्रम व जिल्हा प्रशासनाचे काम–**

१. एकात्मिकृत बालविकास सेवांची सम न्याय उपलब्धता– जिल्हा परिषदचा महिला व बाल विकास विभाग व नागरी विभागाच्या बाल विकास प्रकल्प अधिकारी

जिल्ह्यात सर्व बालकांसाठी समान विकास सेवा अंतर्गत जिल्हा परिषदेचा महिला बाल विकास विभाग ग्रामीण भागासाठी तर नागरी भागासाठी बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्या मार्फत पूरक पोषण आहार योजना तसेच लसीकरण मोहीम राबवण्यात येते. जिल्ह्याच्या ग्रामीण भागात पूरक पोषण आहार अंतर्गत सहा महिने ते सहा वर्ष वयो गटातील एकूण १४,१५३ लाभार्थी, गरोदर स्तनदा माता २७५७ तर सहा महिने ते सहा वर्षे वयोगटातील १४३२२ लाभार्थी यांना लाभ देण्यात आलेला आहे. लसीकरण मोहीम अंतर्गत झिरो ते सहा वर्षे वयोगटातील ३५३८ बालके तर गरोदर/स्तनदा माता १४२९ त्यांना लाभ देण्यात आलेला आहे.

त्याप्रमाणेच बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्यामार्फत जिल्ह्याच्या नागरी भागात अल्पसंख्याक समुदायातील सहा महिने ते सहा वर्षे वयोगटातील २०२१५ तर गरोदर माता ३४८१ यांना पूरक पोषण आहाराचा लाभ देण्यात आलेला आहे. तर झिरो ते सहा वर्षे वयोगटातील ७००५ बालके व ३३९६ गरोदर स्तंदा माता यांचे लसीकरण करण्यात आलेले आहे. अल्पसंख्याक समुदायातील तीन ते सहा वर्षे वयोगटातील ग्रामीण भागातील ६९७८ बालकांना पूर्व प्राथमिक शिक्षण देण्यात आलेले आहे. तर जिल्ह्याच्या नागरी भागात बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्या मार्फत ९४३८ बालकांना प्राथमिक शिक्षण दिलेले आहे.

२. शालेय शिक्षण प्रवेश सुधारणे, सर्व शिक्षा अभियान– शिक्षणाधिकारी प्राथमिक

जिल्ह्यात शालेय शिक्षण प्रवेश सुधारणे व सर्व शिक्षा अभियानांतर्गत एकूण ९९५९० अल्पसंख्यांक विद्यार्थी आहेत. यामध्ये बौद्ध ७२०, ख्रिश्चन १६०, जैन २८२३, पारशी ३८, शीख ११७ व मुस्लिम ९४८३२ अशी विद्यार्थी संख्या आहे.

३. उर्दू शिक्षणासाठी संसाधन: उर्दू शिक्षणासाठी अधिक संसाधनांची उपलब्धता. शिक्षणाधिकारी निरंतर

जिल्ह्यात एकूण १७२ उर्दू शाळा असून शिक्षकांची संख्या १०८९ इतकी आहे या शाळांमध्ये ११४९१ मुले व २०२३५ मुली शिक्षण घेत आहेत.

४. मदरसा शिक्षणाचे आधुनिकीकरण: मदरसा शिक्षणाच्या पद्धतींमध्ये सुधारणा. जिल्हा नियोजन अधिकारी

डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेअंतर्गत सन २०२४-२५ करता तीन संस्थेचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे तो प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय निवड समितीमध्ये मान्य करून शासनास सादर करण्यात आलेला आहे. सन २०२३ -२४ मध्ये या अंतर्गत पाच शाळा प्राप्त पात्र झाले असून त्यासाठी १५ कोटी २३ लाखाचे अनुदान वितरित करण्यात आलेले आहे.

जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून उर्दू शिकविण्यासाठी अधिक संसाधने उपलब्ध करून देण्यात येत आहेत. सोलापूर शहरात सोलापूर महापालिकेच्या ताब्यातील एका मोठ्या भूखंडावर उर्दू घर बांधण्यासाठी ८ कोटी ९७ लाख १९ हजारच्या निधीला प्रशासकीय मान्यता दिलेली असून ८ कोटी ६६ लाखाचे अनुदान वितरित करण्यात आलेले आहे. हे उर्दू घर बांधून पूर्ण झाले असून उपविभागीय अधिकारी क्रमांक एक यांच्याकडे हस्तांतरित करण्यात आलेले आहे.

५. अल्पसंख्याक समुदायातील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना: शिक्षणाधिकारी माध्यमिक

प्री मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०२३ २४ अंतर्गत ऑनलाइन सादर केलेल्या १०८१ नवीन विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती मंजूर झालेले आहे. तर २४ हजार ९११ विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती नूतनीकरण झालेले आहे. बेगम हजरत महल शिष्यवृत्ती योजना सन २०२३ २४ अंतर्गत २१६१ विद्यार्थी पात्र ठरलेले आहेत. विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण सोलापूर अंतर्गत केंद्रशासन पुरस्कृत ३२० अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना १७ लाख रुपये शिष्यवृत्ती देण्यात आलेली आहे तर सन राज्य शासन पुरस्कृत २२ विद्यार्थ्यांना एक लाख तीन हजार तीनशे रुपये देण्यात आलेले आहेत.

अल्पसंख्याक विद्यार्थ्याकरिता रोजगार निर्मिती ही करण्यात येत आहे. या समाजातील दहा विद्यार्थ्यांची विविध परदेशी कंपन्यामध्ये निवड झालेली आहे. अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना वस्तीगृहांचा ही लाभ देण्यात येत आहे.

६. मौलाना आझाद शिक्षण माध्यमातून शैक्षणिक पायाभूत सुविधा निर्माण करणे– जिल्हा नियोजन अधिकारी

जिल्हा नियोजन अधिकारी यांच्याकडून अल्पसंख्यांक शाळांना पायाभूत सोयी सुविधा निर्माण करण्यासाठी दहा लाख रुपयांचे अनुदान देण्यात येत असते. सन २०२१ -२२ मध्ये दोन शाळेंना चार लाख रुपये २०२२- २३ मध्ये पाच शाळांना दहा लाख रुपये व सन २०२३- २४ मध्ये पाच शाळांना १० लाख रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आलेले आहे.

७. गरिबांसाठी स्वयंरोजगार व दैनिक रोजंदारी– जिल्हा प्रशासन अधिकारी , नगरपालिका

दीन दयाळ अंतोदय योजना जिल्ह्यातील १७ नगरपरिषद नगरपंचायत अंतर्गत राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत १०५ अल्पसंख्याकांना वीस लाख ६५ हजाराचे कर्ज वाटप करण्यात आलेले आहे तर पीएम स्व निधी अंतर्गत ९९८ लाभार्थ्यांना दोन कोटी ९५ लाखाचे वाटप करण्यात आलेले आहे.

अ) सुवर्ण जयंती ग्राम शहरी स्वयंरोजगार योजना -महानगरपालिका

राष्ट्रीय नागरी उपयोगाचा अभियान व सामाजिक अभिसरण संस्थात्मक बांधणी अंतर्गत अल्पसंख्याक समाजाचे ६० बचत गट तयार करण्यात आलेले आहेत. त्यांना निधी उपलब्ध करून देण्यात येत असतो. वस्ती स्तर संघ फिरता निधी वाटपा अंतर्गत १६६६ बचत गटांना २५ कोटी ६५ लाखाचे कर्ज वाटप करण्यात आलेले आहे.

ब) शहरी रोजगार योजना -जिल्हा उद्योग केंद्र

८. तंत्रशिक्षणाच्या माध्यमातून कौशल्यवृद्धी– प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था

या माध्यमातून जिल्ह्यातील अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांना तंत्र शिक्षण देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. शासकीय तंत्रनिकेतन सोलापूर या संस्थेच्या आवारात अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींचे शासकीय वस्तीग्रह जून २०१८ मध्ये सुरू करण्यात आले आहे शैक्षणिक वर्ष २०२४ पंचवीस आर्थिक वर्ष साठी वस्तीग्रह व्यवस्थापना करता १७ लाख ३०००० एवढ्या अनुदानाची मागणी केलेली आहे या वस्तीगृहात ३५० विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त झालेले होते त्यानुसार मेरीट प्रमाणे प्रवेश देण्यात आलेला असून अल्पसंख्याक समाजातील २६ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला आहे.

९. आर्थिक कर्ज सहाय्य– जिल्हा अग्रणी बँक व मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ

अग्रणी बँकेमार्फत जिल्ह्यातील ४५ हजार ७८५ अल्पसंख्याक समुदायातील लाभार्थ्यांना ३६८ कोटी रुपयांचे कर्ज वितरण विविध कारणासाठी करण्यात आलेले आहे. त्याप्रमाणेच मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत व्यवसाय व शैक्षणिक कर्ज योजनेअंतर्गत सन २०२३- २४ मध्ये १३३ लाभार्थ्यांना एक कोटी वीस लाखाचे कर्ज देण्यात आलेले आहे.

१०. राज्य आणि केंद्रीय सेवामध्ये भरती: सरकारी नोकऱ्यांमध्ये समावेश.- कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता अल्पसंख्याक समुदायातील २५,६७१ विद्यार्थ्यांनी कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाकडे ऑनलाइन नोंदणी केलेली आहे. कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत अल्पसंख्याक समुदायातील ५५४ लोकांना रोजगार तर ४१ लोकांना स्वयंरोजगार उपलब्ध झालेला आहे

११. ग्रामीण गृहनिर्माण योजनेमध्ये समतोल वाटा पंतप्रधान आवास योजना– जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व जिल्हा प्रशासनाधिकारी नगरपालिका

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत जिल्ह्याच्या ग्रामीण भागात अल्पसंख्याक समुदायातील १६२४ घरकुलांना मंजुरी देण्यात आलेले असून त्यातील १५२३ घरकुले पूर्ण झालेली आहेत तर ९३ घरकुले अपूर्ण आहेत. त्याप्रमाणे जिल्ह्याच्या नागरी भागात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत जवळपास ११७२ घरकुले मंजूर करण्यात आलेली आहेत.

१२. अल्पसंख्याकांच्या झोपडपट्ट्यांमध्ये सुधारणा– महानगरपालिका

अल्पसंख्याक बहुल विकास योजना सन २०२२- २३ अंतर्गत ११ रस्ते कामासाठी ९२ लाख ८५००० चा निधी देण्यात आलेला आहे

१३. जातीय घटनांना आळा: जातीय घटनांना प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना. पोलीस विभाग

जातीय घटनांना प्रतिबंध करण्यासाठी पोलीस विभाग जातीय सलोखा राखण्यासाठी प्रयत्न करत आहे.

१४. सांप्रदायिक गुन्ह्यासाठी अभियोजन -पोलीस विभाग सामाजिक धार्मिक ते निर्माण होऊ नये यासाठी अल्पसंख्याक समाजात सामाजिक सलोखा मोहीम प्रभावीपणे राबवत आहे.

१५. पुनर्वसन योजना: जातीय दंगलीत बळी पडलेल्या व्यक्तींचे पुनर्वसन -पोलीस विभाग जाती दंगेत बळी पडलेल्या व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी उपक्रम हाती घेऊन अशा लोकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम करीत आहे.

या कार्यक्रमाची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील प्रशासनाला नियमितपणे प्रगती अहवाल सादर करणे अनिवार्य आहे. यामुळे अल्पसंख्याक समुदायाच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या योजनांचा लाभ अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचवला जाईल.

पंतप्रधानांचा १५ कलमी कार्यक्रम हा अल्पसंख्याक समुदायाच्या विकासासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, ज्यामुळे त्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीत सुधारणा होण्याची अपेक्षा आहे. व सोलापूर जिल्हा प्रशासन या नवीन १५ कलमी कार्यक्रमाची जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करून या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कसोशीने प्रयत्न करत आहे.

**– सुनील सोनटक्के**
(जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर)

# महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या नवीन संकेतस्थळाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/नागपूर : राज्यातील गोवंशाचे संवर्धन करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या ुारहरसे-ीशींरिरूस.ीस या नवीन संकेतस्थळाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज येथे अनावरण करण्यात आले. विधानभवनातील समिती सभागृहात या संकेतस्थळाचे अनावरण करण्यात आले. राज्यामध्ये देशी गोवंशाचे संवर्धन, संरक्षण व कल्याण करण्यासाठी आणि त्यासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांचे पर्यवेक्षण करण्यासाठी, गोसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. राज्यात १ कोटी ३९ लाख गोवंश असून त्यामध्ये १३ लाख देशी गायी असल्याची माहिती अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी दिली. ङ्गगो टेनङ्घ अंतर्गत गो संगोपन, गो संवर्धन, गो संरक्षण, गोमय मुल्यवर्धन, गोशाळा, गोरक्षक, गोपालक, गो आधारीत शेती, गो साक्षरता आणि गो पर्यटन या माध्यमातून गायींच्या संवर्धनाचे काम करण्यात येत आहे. राज्यात देशी गायींसाठी विशेष दुग्धशाळा (डेअरी) निर्माण करण्यात येतील, असेही श्री. मुंदडा यांनी सांगितले. आयोगामार्फत देशी गोवंशाचे संवर्धन, संरक्षण व कल्याण करणे व त्यासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांचे पर्यवेक्षण केले जात आहे. गोशाळा, गोसदन, पांजरपोळ व गोवंश संस्थांची नोंदणी, गोवर्धन गोवंश सेवा केन्द्र योजना व इतर योजना अंतर्भुत करणे व त्याची अंमलबजावणी करणे, पशुआरोग्य सेवांचे प्रचालन करणे, दुर्बल, वयस्क व रोगग्रस्त पशुंचे व्यवस्थापन, काळजी व उपचार यांची सुनिश्चिती, पशुंची काळजी घेणाऱ्या व्यक्तींचे प्रशिक्षण आणि जनजागृती केली जात आहे.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगमार्फत सन २०२५ मध्ये होणाऱ्या स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका):- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एम.पी.एस.सी) सन २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आले आहे, अशी माहिती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अवर सचिव र. प्र.ओतारी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

आयोगामार्फत जाहिरात प्रसिद्ध केलेल्या या अंदाजित वेळापत्रकामध्ये दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षांमध्ये दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ सर्व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग पूर्व परीक्षा, व मुख्य परीक्षा, महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब व गट-क सेवा संयुक्त परीक्षामध्ये महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब व गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा, महाराष्ट्र अराजपत्रित गट -ब सेवा मुख्य परीक्षा, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक मुख्य परीक्षा, महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा, महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा पूर्व परीक्षामध्ये महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा, अन्न व औषध प्रशासकीय सेवा मुख्य परीक्षा, महाराष्ट्र विद्युत व यांत्रिकी, अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा, महाराष्ट्र कृषी सेवा मुख्य परीक्षा, महाराष्ट्र यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा, महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा, महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा, निरीक्षक वैद्यमापक शास्त्र मुख्य परीक्षा, राज्यसेवा मुख्य परीक्षा, महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षांचा समावेश आहे. सदर वेळापत्रक अंदाजित असून त्यामध्ये बदल होऊ शकतो. काही बदल झाल्यास त्याबाबतची माहिती आयोगाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणार आहे. उमेदवारांनी अधिक माहितीसाठी आयोगाच्या संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अवर सचिव ओतारी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### विवाहितेचा छळ करत मारहाण; पतीसह चौघांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : विवाहितेचा छळ करत मारहाण केल्याप्रकरणी पतीसह चार जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि घटना दि.१५ सप्टेंबर २०१३ ते २१ मार्च २०२१ रोजी पर्यंत फिर्यादी यांच्या सासरी हातकनगले कोल्हापूर येथे घडली. याप्रकरणी मेघा घनश्याम गायकवाड (वय-२९,रा.विजय लक्ष्मी,नगर नई जिंदगी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती घनश्याम गायकवाड, सासू रेखा, नणंद शिरीषा माने, चुलत सासू यांची मुलगी उज्वला भिसे (सर्व.रा.लाल नगर,इचलकरंजी हातगनगले,कोल्हापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार मुजावर हे करीत आहेत.

### मोबाईल पळवला

सोलापूर, (प्रतिनिधी) : मार्केट यार्ड येथील महाराष्ट्र ट्रेडर्स दुकानाजवळ फिर्यादी सोमनिंग महादेव पुजारी (वय-४०,रा. वळकबाळ) हे दुकानाजवळ झोपलेले असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या खिशा-तील बारा हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून न्यायला आहे. ही घटना २५ नोव्हेंबर रोजी घडली याप्रकरणी सोमनिंग पुजारी यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोह. नदाफ हे करीत आहेत.

श्री सिद्धेश्वर महायात्रा २०२५....

# राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायद्याअंतर्गत श्री सिद्धेश्वर महायात्रेचा कृती आराखडा तयार करावा : अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर

## श्री सिद्धेश्वर महा यात्रेचे दिनांक १२ ते १६ जानेवारी २०२५ या कालावधीत आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : श्री सिद्धेश्वर महायात्रा दिनांक १२ ते १६ जानेवारी २०२५ या कालावधीत होत असून यासाठी श्री सिद्धेश्वर मंदिर व होम मैदान येथील मनोरंजन नगरीमध्ये संपूर्ण महिनाभर प्रतिदिन हजारो भाविक येतात. त्यामुळे या कालावधीत कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अंतर्गत श्री सिद्धेश्वर महा यात्रेचा कृती आराखडा तयार करावा व ही महायात्रा शांततेत व नियोजनबद्ध रीतीने पार पाडण्यासाठी सर्वांनी परस्परात समन्वय ठेवावा, असे आवाहन अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित श्री सिद्धेश्वर महायात्रा २०२५ अंतर्गत पूर्वतयारी आढावा बैठकीत अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर मार्गदर्शन करत होत्या. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुने, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उत्पादन शुल्क विभागाच्या अधीक्षक भाग्यश्री जाधव, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, शहर अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे,

**होम मैदानावरील मनोरंजन नगरीसाठी विक्रेते व स्टॉल धारक यांच्याकडून जागेची अचूक मागणी घ्यावी**

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे यांच्यासह पोलीस व संबंधित विभागाचे अधिकारी तसेच देवस्थान पंच कमिटीचे सदस्य उपस्थित होते.

अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर पुढे म्हणाल्या की, यात्रा कालावधीत मंदिर, मंदिर परिसर व होम मैदान या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था अत्यंत चोख असावी. पोलीस विभागाने यात्रा कालावधीत नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांचे योग्य नियोजन करावे. होम मैदानावर होणाऱ्या मनोरंजन नगरीसाठी मंदिर समिती, पोलीस प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग व महापालिकेने एकत्रित बसून कृती आराखडा तयार करावा. तसेच या ठिकाणी स्टॉल लावणारे विक्रेते यांना त्यांच्या स्टॉलसाठी किती जागा आवश्यक आहे याची बिनचूक मागणी नोंदवून त्या पद्धतीने नियोजन करावे व सुरक्षेच्या दृष्टीने हे स्टॉल सुटसुटीत असणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

श्री सिद्धेश्वर महायात्रा कालावधी जवळपास एक महिन्याचा असल्याने या कालावधीत सर्वसामान्य नागरिक भक्तगण यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही तसेच गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी वाहतूक विभागाने वाहन व्यवस्था पार्किंगची व्यवस्था आधी बाबीवर अधिक लक्ष द्यावे. यात्रा कालावधीत दिनांक १३ जानेवारी २०२५ रोजी होणारा अक्षता कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर भाविक उपस्थित राहतात त्या अनुषंगाने काटेकोर नियोजन करावे. सर्व संबंधित शासकीय यंत्रणा तसेच श्री सिद्धेश्वर मंदिर देवस्थान पंच कमिटीचे सदस्य यांनी परस्परात योग्य समन्वय ठेवून ही महायात्रा शांततेत पार पाडावी यासाठी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायद्याअंतर्गत पुढील आठ दिवसात कृती आराखडा तयार करावा, असे निर्देश श्रीमती ठाकूर यांनी दिले.

प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी श्री सिद्धेश्वर महायात्रा २०२५ अंतर्गत श्री सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटी तसेच सर्व शासकीय यंत्रणावर असलेली जबाबदारी याची माहिती दिली. तसेच यात्रा कालावधीत कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अंतर्गत करावयाची कार्यवाही याचीही माहिती त्यांनी दिली.

उपविभागीय अधिकारी तथा इन्सिडेंट कमांडर श्री. पडदुने यांनी श्री सिद्धेश्वर माहेत्रा दिनांक १२ ते १६ जानेवारी २०२५ या कालावधीत होत असून दिनांक १२ जानेवारी रोजी ६८ लिंग प्रदर्शन १३ जानेवारी रोजी अक्षता कार्यक्रम १४ जानेवारी होम हवन असे कार्यक्रम होणार असल्याची माहिती त्यांनी दिली. तर पंच कमिटीचे सदस्य श्री. कस्तुरे व श्री. बिराजदार यांनी श्री सिद्धेश्वर देवस्थान समितीच्या वतीने यात्रा कालावधीत देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांची माहिती दिली.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या तालुका अध्यक्षपदी अरूण लोखंडे तर तालुका उपाध्यक्षपदी इरफान काझी यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई तालुका शाखा तुळजापूर च्या तालुका अध्यक्ष पदी पत्रकार अरुण लोखंडे यांची सलग चौथ्यांदा फेरनिवड करण्यात आली तर तालुका उपाध्यक्ष पदी जेष्ठ पत्रकार इरफान अबुजर काझी (नळदुर्ग) यांची निवड करण्यात आली आहे.





दि.१६ डीसेंबर २०२४ रोजी जेष्ठ पत्रकार इरफान काझी यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई तालुका शाखा तुळजापूर च्या पदाधिकारी व सदस्यांची एक महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली.या बैठकीत पत्रकार संघाच्या वर्षभरातील कामकाजाचा आढावा घेऊन विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

तसेच या बैठकीत पत्रकार संघाच्या तुळजापूर तालुका कार्यकारिणीची.निवड करण्यात आली असून पत्रकार संघाच्या तुळजापूर तालुका अध्यक्ष म्हणून जळकोट ता.तुळजापूर येथील पत्रकार अरुण नारायण लोखंडे यांची फेर निवड करण्यात आली तर तालुका उपाध्यक्ष पदी जेष्ठ पत्रकार इरफान काझी (नळदुर्ग) यांची निवड करण्यात आली आहे.

कार्यकारिणी पुढील प्रमाणे सचिव पत्रकार एस.के.गायकवाड, सहसचिव संजय पीसे, कार्याध्यक्ष पत्रकार विजय पिसे, सल्लागार मारुती बनसोडे, किशोर धुमाळ, संघटक शामकांत नागीले आर्दींची निवड बिनविरोध करण्यात आली. तर मंत्रालयीन प्रतिनिधी म्हणून पत्रकार अहमद शेख यांची निवड करण्यात यावी असा ठराव या बैठकीत मंजूर करण्यात आला.अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात ही बैठक संपन्न झाली.अरुण लोखंडे यांच्या निवडीचे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई चे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष वसंत मुंडे यांनी भ्रमण ध्वनी वरुन अभिनंदन केले असून मित्र परिवारामध्येही त्यांचें सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# शाळा या कलागुण व्यक्त करण्याचं व्यासपीठ : पो. नि. गुरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : विद्यार्थी जीवनात अभ्यासाबरोबरच व्यायाम हा सुद्धा महत्त्वाचा घटक आहे. व्यायामाने विद्यार्थ्यांचा शारीरिक व बौद्धिक विकास होतो. शाळा या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणारे, त्यांच्या कलागुणांना वाव देणारे, त्या कलागुणांना व्यक्त करण्याचे एक व्यासपीठ आहे असे प्रतिपादन निफाड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गुरव यांनी केले.



निफाड इंग्लिश स्कूल, निफाड येथे वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त विविध क्रीडास्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे त्यावेळी प्रमुख उद्घाटक म्हणून ते बोलत होते. शाळांतून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो व त्यांच्या जीवनाला वेगळी कलाटणी मिळते असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी निफाड इंग्लिश स्कूलचे चेअरमन ड. प्रवीण ठाकरे, सरस्वती विद्यालय निफाडचे चेअरमन नंदलाल चोरडिया, प्रवीण कराड, निफाड इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक अरुण महाजन, पर्यवेक्षक कैलास सोनवणे यांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. या क्रीडास्पर्धात विद्यार्थ्यांनी हिरारीने सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा प्रमुख शगुफ्ता शेख यांनी केले तर आभार सांस्कृतिक प्रमुख वंदना खैरनार यांनी मानले.

# अरिहंत पब्लिक स्कूलने केलेली काम गौरवास्पद : अंजलीताई अवताडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : नवा पिढीला संस्कार व शिक्षण इंग्रजीतून मिळावे यासाठी ज्ञानदानाची केलेली काम अरिहंत पब्लिक स्कूल यांनी केलेली काम हे गौरवास्पद आहे.




येथील पर्यंत पब्लिक स्कूल च्या सुवर्ण महोत्सवी वार्षिक स्नेहसंमेलन २०२४ कार्यक्रमानिमित्त उपस्थित प्रमुख पाहुणे विद्यार्थ्यांचे हितगुच्छ पुढील वाटचालीस शैक्षणिक संस्थेत शुभेच्छा दिल्या.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष उज्वल जोशी व संस्थेचे सचिव डॉक्टर शितल शहा उपस्थित होते.

पुढे या म्हणाले की आधुनिक नव्या युगाच्या अधोरेखित करणारी भाषा म्हणजे इंग्रजी विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थेचे अध्यापक पिढीची गरज ओळखून एकही संस्थेने विद्यार्थ्यांना अतिशय मोलाचे घडवण्याची काम केले आहे यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व यावेळी शिक्षकेतर कर्मचारी व शिक्षक उपस्थित होते.

# डुबेरे विद्यालयात आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी:- राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम ग्रामीण रुग्णालय दोडी बुद्रुक यांच्यावतीने डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी संपन्न झाली. तपासणी करताना आजार आढळलेल्या विद्यार्थ्यांना पुढील तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालय सिन्नर व दोडी या ठिकाणी पुन्हा तपासणीसाठी बोलावण्यात आले .



तसेच इयत्ता नववी ते बारावी पर्यंतच्या मुलींना मासिक पाळीविषयी मार्गदर्शन करण्यात आले. मासिक पाळीच्या काळात घ्यावयाची स्वच्छता व काळजी तसेच या काळात घ्यावयाचा सकस आहार या विषयी मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे यांनी प्रास्ताविक करून उपस्थित डॉक्टर व सेवकांचा सत्कार व स्वागत केले.सूत्रसंचालन पी. आर. करपे यांनी तर आभार सोमनाथ गिरी यांनी मानले.

दोडी ग्रामीण रुग्णालयाच्या आरोग्य अधिकारी डॉ. सरिता भालेराव, औषधनिर्मिती पल्लवी धुसे व पूनम पाचोरे यांनी विद्यार्थ्यांची तपासणी करून मार्गदर्शन केले.

## अश्विनी होळे-कवडे यांच्या वारसदार पुस्तकाचे प्रकाशन

## प्रख्यात व्याख्याते प्रा.विशाल गरड यांचे प्रतिपादन

# आध्यात्माचा वारसा जोपासला पाहिजे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

येरमाळा : सुधाकर रणदिवे. दि.१५ वाशी तालुक्यातील खामकरवाडी येथे लेखिका अश्विनी होळे - कवडे यांच्या 'वारसदार' या पुस्तक प्रकाशन प्रसंगी सामाजिक घडामोडीचे अभ्यासक, लेखक प्रख्यात व्याख्याते प्रा.विशाल गरड बोलताना म्हणाले.

शनिवार (ता.१४) खामकरवाडी दत्त मंदिरात प्रमुख पाहुणे म्हणुन प्रा.डॉ.अशोकराव मोहेकर,व्याखयाते प्रा.विशाल गरड यांच्या हस्ते अश्विनी होळे / कवडे लिखित 'वारसदार' पुस्तक प्रकाशन सोहळा पार पडला.यावेळी उपजिल्हाधिकारी अहिल्या होळे,भारतीय स्टेट बँक येरमाळा शाखाचे व्यवस्थापक महेंद्र भोर,बिभीषण खामकर,बाबुराव घुले, सरपंच रामराजे जाधव प्रा.अंगदराव होळे, दत्तात्रय कवडे,वैभव कवडे,लेखिका अश्विनी होळे - कवडे शिक्षिका मैनाबाई बारकुल, डॉ.विवेक होळे,यांची प्रमुख उपस्थिती होती.



पुस्तक प्रकाशन कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. मान्यवरांच्या हस्ते पुस्तक प्रकाशनानंतर पुढे बोलताना प्रा.विशाल गरड म्हणाले की 'वारसदार' पुस्तकाच्या लेखानातून लेखिका अश्विनी होळे यांनी आध्यत्माचा वारसा जपला असुन त्यांच्या आजी कै. कृष्णामाई होळे यांच्या अध्यात्मिक श्रद्धा,जीवनावर आधारित असुन त्यांनी केलेली श्री.दत्त महाराजांची, गानगापूर येथे मंदिरात राहून केलेली नऊ वर्ष सेवा त्यासेवेच्या श्रद्धेवर त्यानी सुख समाधानाने चालविलेले एकत्रित कुटुंब, त्यांच्या श्रद्धेला पाहुन शेतात प्रकटलेले दत्त महाराज,ते

**लेखिका अश्विनी होळे - कवडे यांनी आजी कृष्णमाईच्या जीवनप्रवासाची वारसदार ठरली असुन आपल्या घरातील इरकलीतील आज्या,धोत्रातील माणसं आपल्यावर गर्भसंस्कारासह जीवनाची संस्कार करणारी चालती बोलती विद्यापीठ असुन ही विद्यापीठ जपली पाहिजेत जोपासली पाहिजेत असेही प्रा.गरड म्हणाले.**

गावातील मंदिर जीर्णोद्धार पर्यंतची कथा मांडल्याचे सांगत, विज्ञानाला विचार करायला लावणारे आध्यात्म म्हणजे अध्यात्मावर लिहिणे सोपी गोष्ट नसुन सध्याच्या मोबाईलच्या युगात अध्यात्मावर प्रतिभाशाली लेखन केल्याचे कौतुक करत, खामकरवाडी गावाची ओळख नागवेडा (नागीण) भयानक त्वचा विकाराच्या अजारावर मंत्र टाकण्यासाठी राज्याच्या काना कोपऱ्यातून लोकं येत असल्याचे सांगताना माझा अनुभव आहे मी औषध उपचारावर बक्कळ पैसे खर्चून न बरा झालेला आजार मंत्र टाकुन तीन दिवसाचे पथ्य पाळून बरा झाल्याचे सांगितले. विज्ञानाच्या पूर्वी आमच्या आध्यात्माने पुष्पक विमानाचा शोध लावला असेल तर आमच्या अध्यात्म,मंत्रात ताकत असुन विठ्ठल विठ्ठलाच्या ठ.. ठ...ठ उच्चारातून आपले हृदयाचे ठोके सुरळीत होतात.याशिवाय चालु सामाजिक घडामोडीतील, कौटुंबिक वारसा जपताना गडगंज मालमत्ता असुन उपयोग नाही त्याला वारसदार तसा लाभला नाही तर वैभवाला अर्थ नसल्याची खंत व्यक्त करुन, देशाला भूगोल लाभला असला तरी महाराष्ट्राला हजारो वर्षाच्या इतिहासाचा वारसा लाभला असुन 'छत्रपती शिवाजी महाराज 'म्हणताच अंगावर रोमांच उभारतो तो आमचा वारसा आहे.तेव्हा तरुण पिढी, विद्यार्थांनी मोबाईल सोडुन रील पाहायचे सोडुन,रील बनवायचे सोडुन,आपल्याला लाभलेल्या विविध खेळ,कवायती, सामाजिक,भौगोलिक, शैक्षणिक, ऐतिहासिक, वारसा जोपासला पाहिजे वाढवला पाहिजे यासाठी मन लावून,अभ्यास करणे,वाचनाच्या सवयी जोपसने काळाची गरज असल्याचे त्यांनी उपस्थितांना उद्देशून सांगितले.

अश्विनी होळे या कॉम्प्युटर इंजिनीयर असुन त्या सध्या स्टेट बँकेचे ग्राहक सेवा केंद्र चावलात. इंजिनिअर असुन लेखनचा छंद जोपासून पुस्तकं लिहिल्या बद्धल लेखिका होळे यांचे प्रमुख पाहुणे व्याख्याते प्रा.विशाल गरड यांनी विशेष कौतुक केले.

पुस्तक लेखनासह प्रकाशना पर्यंत मोलाची साथ देणाऱ्या अश्विनी होळे यांचे पती वैभव कवडे यांचे कौतुक करुन लेखिका अश्विनी होळे यांना पुढील लेखन प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी येरमाळा पत्रकार संघ,प्राचार्य सुनील लुगडे,बन्सी होळे,आंनद होळे, दत्तात्रय होळे,सागर होळे, विशाल,प्रवीण होळे, जनार्धन लुगडे यांनी परिश्रम. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.अतुल होळे, यांनी केले तर आभार येरमाळा पत्रकार संघाचे सचिव दत्ता बारकुल यांनी मानले.

## थोडक्यात...

### तुला लय मस्ती आली का म्हणत सत्तुरने मारहाण

सोलापूर (प्रतिनिधी) किरकोळ कारणावरून शिवीगाळ करत तुला लय मस्ती आली आहे का असे म्हणून फिर्यादी विकी रवींद्र म्हेत्रे (वय-३३,रा.कोनापुरे चाळ) यांना सत्तुरने मारहाण करून गंभीर जखमी केले.ही घटना १५ डिसेंबर रोजी सकाळी पावणे अकरा वाजण्याच्या दरम्यान महापौर बंगल्याजवळ घडली.

याप्रकरणी विकी म्हेत्रे यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून मनीष दीपक नाईक (रा.ऐश्वर्या अपार्टमेंट,रेल्वे लाईन) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास मसपोनि.केंद्रे या करीत आहेत.

### माहेरून पैसे आणण्यासाठी विवाहितेचा छळ

सोलापूर (प्रतिनिधी) विवाहिता ही सासरी नांदत असताना तिला वेळोवेळी माहेरून पैसे आणण्यासाठी शारीरिक व मानसिक त्रास देऊन छळ करत असल्याची फिर्याद दिपाली बिपिन लोणकर (वय-३६,रा.जगदंबा चौक) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अशोक सतीश माने (रा.बेडर पूल,दर्गा मंदिर समोर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना २० ऑगस्ट २०२० ते आजतागायत पर्यंत फिर्यादी यांच्या सासरी घडली.या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार इनामदार हे करीत आहेत.

### मत्स्यव्यवसाय योजनांच्या लाभांसाठी राष्ट्रीय मत्स्य विकास पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन

सोलापूर (जिमाका) : मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत येणाऱ्या योजनांच्या लाभासाठी जिल्ह्यातील मत्स्यव्यवसायाशी संबधित व्यक्ती व संस्था यांनी राष्ट्रीय मत्स्यव्यवसाय डीजिटल प्लॅटफॉर्म (एन.एफ.डी.पी) पोर्टलवर नोंदणी करावी असे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय रत्नाकर राजम यांनी केले आहे.

जिल्ह्यातील सर्व वैयक्तिक मच्छिमार, मत्स्यसवंर्धक/ झचचडध लाभार्थी तसेच सर्व मच्छिमार सहकारी संस्था, मत्स्यव्यवसाय विभागाच्या कोणत्याही योजनेचा लाभ मिळणेसाठी राष्ट्रीय मत्स्यव्यवसाय डीजिटल प्लॅटफॉर्म (एन.एफ.डी.पी) पोर्टलवर नोंदणी असणे आवश्यक आहे. सदरची नोंदणी https://NFDP.dof.gov.in या लिंकवर स्वतः किंवा नजीकच्या सीएससी केंद्रात आधारकार्ड, बँक पासबुक यासह जाऊन विनामुल्य करता येईल. तसेच ई-श्रम कार्डसाठीची नोंदणी https://eshram.gov.in या लिंकवर करावी. अपघात गट विमा नोंदणीबाबतची ३१ कॉलमची माहिति तसेच के.सी.सी बाबतची माहिती या कार्यालयात सादर करावी असेही सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यसाय श्री.राजम यांनी कळविले आहे.

# अन्नत्याग आंदोलनाला प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी फिरवली पाठ!

## शेतकऱ्याने शेतकऱ्यासाठी केलेल्या लढ्याला उग्र रूप येण्याची शक्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

देऊळगाव राजा तालुक्यातील शिवनी आरमाळ येथील शेतकरी कैलास नागरे यांनी शिवनी आरमार लघु प्रकल्पावर दिनांक १५ डिसेंबर पासून सुरू केलेल्या अन्न त्याग आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी सुद्धा प्रशासनाचा कोणताही अधिकार्याने भेट न दिल्याने कैलास नागरे सह शेतकऱ्यांच्या मनामध्ये शासनाच्या प्रती रोष वाढत असून वेळीस शासनाने ह्या अन्नत्याग आंदोलनाची दखल न घेतल्यास हे आंदोलन तीव्र रूप घेईल यात शंका नाही.

**कैलास नागरे यांच्या अन्नत्याग आंदोलनाला अनेक ग्रामपंचायती सह शेतकऱ्यांनी दिला पाठिंबा**

दिनांक १७ डिसेंबर रोजी या आंदोलनाला अनेक ह्या भागातील ग्रामपंचायतीच्या सरपंचांनी आपला पाठिंबा दिला असून अनेक राजकीय सामाजिक कार्यकर्त्यांनी या उपोषण मंडपात भेटी दिल्या. माजी जिल्हा परिषद सदस्य मधनशिंग शिपने, माजी जिल्हा परिषद सदस्य भगवानराव मुंढे,माजी आमदार तोताराम कायंदे,क्रांतीकारी शेतकरी संघटनेच्या .शर्वरीताई रविकांत तुपकर,सामजिक संघटनचे गजानन दराडे, शेतकरी कृषी योद्धा समितीचे बालाजी सोसे,गजानन जायाभाये, हभप रमेश जायभाये,अंढेरा सरपंच रुपाली ताई आंबिलाकर,बायगाव सरपंच रेखा शंकर नागरे, मेंडगावच्या विद्या भगवान कायंदे, सावखेड येथील मीरा संजय मोरे,पाडली शिंदे येथील संगीताताई ठेंग,आदीं ग्रामपंचायतीने पाठिंबा देत भेटी दिल्या आहेत.



# उल्हासनगर शहरातील मुख्य रस्त्यांवरील बेवारस वाहनांविरुध्द कारवाई





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बाळासाहेब अहिरे/उल्हासनगर प्रतिनिधी : उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्रमुख रस्ते अतिक्रमणमुक्त राहतील या दृष्टीने धडक कारवाई हाती घेण्याचे आदेश मा. प्रशासक तथा आयुक्त यांनी सर्व सहायक आयुक्त, प्रभाग समिती यांना दिलेले आहेत. त्या अंतर्गत शहरातील मुख्य रस्त्यांवर अनेक ठिकाणी बेवारस वाहने पडून असल्याचे निर्दशनास आले होते. सदर बेवारस वाहनांमुळे वाहतुक कोंडी होत असल्याचे देखिल दिसून आले होते.

सहायक आयुक्त, प्रभाग समिती क्र. १ ते ४ यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शहर वाहतुक शाखा, उल्हासनगर यांचे समवेत बेवारस वाहने हटविण्यासाठी संयुक्त कारवाई सुरु केलेली आहे. दिनांक ०१/१२/२०२४ पासून उल्हासनगर शहरातील मुख्य रस्त्यांवर ४९ बेवारस वाहने पडून असल्याचे निर्दशनास आले होते. सदरच्या वाहनांवर नियमाप्रमाणे नोटीस लाऊन वाहने हटविण्यासाठी वाहन मालकांना ताकीद देण्यात आली होती. अशाप्रकारे वाहनांवर नोटीस लावल्यानंतर एकूण ३७ वाहने मुख्य रस्त्यांवरुन हटविण्यात आल्याचे दिसून आले. तथापी काही वाहने हटविण्यात आलेले नसल्याचे दिसून आल्याने वाहतुक पोलीसांसोबत संयुक्त कारवाई करुन १२ बेवारस वाहने जमा करण्यात आलेली आहेत.

उल्हासनगर शहरातील मुख्य रस्त्यांवरील बेवारस वाहनांविरुध्द यापुढे देखिल सदरची कार्यवाही सुरु ठेवण्यात येणार आहे.

# संविधान विटंबनेच्या निषेधार्थ मोहा येथे कडकडीत बंद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/कळंब: सुधाकर रणदिवे कळंब तालुक्यातील मोहा येथे परभणीत झालेल्या संविधानाच्या विटंबनेचा निषेध म्हणून भीम नगर येथील समस्त भीमसैनिकांनी मोहा बंद ची हाक दिली होती. त्याला प्रतिसाद देत गावकऱ्यांनी दिवसभर आपली दुकाने बंद ठेवून परभणी येथील घटनेचा निषेध केला.




यावेळी भीम नगर येथील भिमसैनिक यांनी पोलिसांना दिलेल्या निवेदनामध्ये परभणी येथील घटनेमध्ये जबाबदार असणाऱ्या दोषीवर तात्काळ कारवाई करावी या घटने दरम्यान अटक केलेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलिसांच्या ताब्यात असताना झालेल्या मृत्यूचे प्रकरण फास्टट्रॅक कोर्ट वर चालवून दोषींना लवकरात लवकर शिक्षा देण्याचे काम करावे व पीडीतास न्याय द्यावा ही मागणी करण्यात आली. तसेच परभणी येथील आंदोलनात निष्पाप भीम सैनिकावर दाखल केलेले खोटे गुन्हे तात्काळ मागे घ्यावे अशा स्वरूपाची मागणी मोहा येथील ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष अशोक कसबे, बाबासाहेब कसबे,राहुल कसबे, विशाल कसबे, शुभम कांबळे, तानाजी कसबे, आधी भीम सैनिकांनी निवेदनामार्फत प्रशासनाकडे केली आहे. या वेळी, गावातील शाळा, कॉलेज ,दुकाने, सर्व बंद करण्यात आली होती.

# बसवर दगडफेक ; तिघा अज्ञात इसमांवर गुन्हा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) बसवर दगडफेक केल्याप्रकरणी तीन अज्ञात इसमानविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना १६ डिसेंबर रोजी सायं पाच ते सव्वा पाच वाजण्याच्या दरम्यान प्रभाकर महाराज चौक व डी मार्ट समोर घडली.याप्रकरणी कैलास आनंदराव हेंडगे (वय-३८,एसटी चालक,रा.गौळ तालुका कंदार जिल्हा नांदेड) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात तीन इस्मानविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची हकीकत अशी की,फिर्यादी हे त्यांच्या ताब्यातील एसटी बस क्रमांक एमएच.१४ बी.टी.४९५२ ही घेऊन जात असताना अज्ञात कारणावरून बसवर दगडफेक केली.त्यानंतर बसची काच फुटून चार हजारांचे नुकसान झाले.तसेच साक्षीदार बालाजी दत्तात्रय गंगणे हे चालवीत असलेल्या बस क्रमांक एम एच.०५ ईएम.१३८२ यावरही दगड फेकून काच फोडून सहा हजारांचे नुकसान केले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक खंडागळे हे करीत आहेत.

**१ जानेवारी २०२५ पासून होणार सुरुवात**

**रेल्वे प्रवाशांना आवाहन**

# सोलापूर विभागातील २० रेल्वे गाड्यांना नवे क्रमांक, नवीन ओळख !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : भारतीय रेल्वे विभागाने अनेक गाड्यांचे चालू असणारे क्रमांक हे पुन:क्रमांकित करण्याचा निर्णय घेतला आहे. दिनांक ०१ जानेवारी २०२५ पासून हे नवे क्रमांक गाडीला मिळणार आहेत .



पुन:क्रमांकित करण्यात आलेल्या सोलापूर रेल्वे विभागातून धावणाऱ्या गाड्यांचा तपशील खालीलप्रमाणे :-

सोलापूर-वाडी या डेमू ट्रेन चा पूर्वीचा क्रमांक हा ०१३८१ हा होता तो आता ७१४५१ असा असणार आहे.

वाडी-सोलापूर या डेमू ट्रेन चा पूर्वीचा क्रमांक हा ०१३८२ हा होता तो आता ७१४५२ असा असणार आहे.

निझामाबाद-पंढरपूर या जलद एक्सप्रेस ट्रेन चा पूर्वीचा क्रमांक हा ०१४१३ हा होता तो आता ११४१३ असा असणार आहे.

पंढरपूर-निझामाबाद या जलद एक्सप्रेस ट्रेन चा पूर्वीचा क्रमांक हा ०१४१४ हा होता तो आता ११४१४ असा असणार आहे.

कुर्डुवाडी-मिरज या डेमू ट्रेन चा पूर्वीचा क्रमांक हा ०१५४५ हा होता तो आता ७१४२१ असा असणार आहे.

मिरज-कुर्डुवाडी या डेमू ट्रेन चा पूर्वीचा क्रमांक हा ०१५४६ हा होता तो आता ७१४२२ असा असणार आहे.

सोलापूर-होस्पेट या जलद एक्सप्रेस ट्रेन चा पूर्वीचा क्रमांक हा ११३०५ हा होता तो आता ११४१५ असा असणार आहे.

होस्पेट-सोलापूर या जलद एक्सप्रेस ट्रेन चा पूर्वीचा क्रमांक हा ११३०६ हा होता तो आता ११४१६ असा असणार आहे.

बिदर-कलबुर्गी या जलद एक्सप्रेस ट्रेन चा पूर्वीचा क्रमांक हा ०७७६१ हा होता तो आता ७७६३१ असा असणार आहे.

कलबुर्गी-बिदर या जलद एक्सप्रेस ट्रेन चा पूर्वीचा क्रमांक हा ०७७६२ हा होता तो आता ७७६३२ असा असणार आहे.

बिदर-कलबुर्गी या जलद एक्सप्रेस ट्रेन चा पूर्वीचा क्रमांक हा ०७७६३ हा होता तो आता ७७६३३ असा असणार आहे.

कलबुर्गी-बिदर या जलद एक्सप्रेस ट्रेन चा पूर्वीचा क्रमांक हा ०७७६४ हा होता तो आता ७७६३४ असा असणार आहे.

कलबुर्गी-बिदर या जलद एक्सप्रेस ट्रेन चा पूर्वीचा क्रमांक हा ०७७४५ हा होता तो आता ७७६३८ असा असणार आहे.

बिदर-कलबुर्गी या जलद एक्सप्रेस ट्रेन चा पूर्वीचा क्रमांक हा ०७७४६ हा होता तो आता ७७६३५ असा असणार आहे.

कलबुर्गी-बिदर या जलद एक्सप्रेस ट्रेन चा पूर्वीचा क्रमांक हा ०७७४७ हा होता तो आता ७७६३६ असा असणार आहे.

बिदर-कलबुर्गी या जलद एक्सप्रेस ट्रेन चा पूर्वीचा क्रमांक हा ०७७४८ हा होता तो आता ७७६३७ असा असणार आहे.

बिजापुर-रायचूर या जलद एक्सप्रेस ट्रेन चा पूर्वीचा क्रमांक हा ०७६६३ हा होता तो आता ५७६६२ असा असणार आहे.

रायचूर - बिजापुर या जलद एक्सप्रेस ट्रेन चा पूर्वीचा क्रमांक हा ०७६६४ हा होता तो आता ५७६६१ असा असणार आहे.

वाडी - काचीगुडा या जलद एक्सप्रेस ट्रेन चा पूर्वीचा क्रमांक हा ०७७५१ हा होता तो आता ५७६०२ असा असणार आहे.

काचीगुडा फलकनुमा - वाडी या जलद एक्सप्रेस ट्रेन चा पूर्वीचा क्रमांक हा ०७७५२ हा होता तो आता ५७६०१ असा असणार आहे.

तरी येणाऱ्या नवीन वर्षांपासून वर नमूद केलेल्या सोलापूर विभागातून धावणाऱ्या गाड्यांचा झालेला पुन:क्रमांक लक्षात ठेवून सदरच्या गाडीने प्रवास करणाऱ्या रेल्वे प्रवाश्यांची आरक्षण करतेवेळी हे क्रमांक लक्षात ठेवून आपला प्रवास निश्चित करावा असे आवाहन सोलापूर रेल्वे विभागाचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक श्री योगेश पाटील यांनी केले आहे.

# परभणी येथील संविधान विटंबनेच्या प्रकरणातील कोरेगाव भिमा विजय रणस्तंभ सेवा संघाने केल्या विविध मागण्या



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

१) पोलिसांच्या कोबिंग ऑपरेशनची आणि एकूण सर्व प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करावी २) कलम १७६ (१४) सीआरपीसी अन्वये पा प्रकरणाची चौकशी करावी. ३) न्यायालयीन चौकशी ही सेवानिवृत न्यायाधिशाकडून न करता सिटींग न्यापाधिशामार्फत करावी. ४) पोलीस निरीक्षक अशोक घोरबाड सह इतर पोलीस अधिका-यांवर कलम ३२ अन्वये, ॲट्रॉसिटी कायद्यान्वये कलम ३११) आणि ३(२) प्रमाणे गुन्हे दाखल करावेत. सोबतच सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा. ५) परभणी माहरातील सर्व पोलीस स्टेशन मधील तातडीने सीसीटीव्ही जप्त करून ते सीसीटिव्ही तपासावे, ६) सोमनाथ व्यंकट सूर्यवंशी यांच्या कुटुंबियांना सरकारने तातडीने ५० लाखाची आर्थिक मदत जाहीर करावी ७) सोमनाथ व्यंकट सूर्यवंशी यांच्या कुटुंबातील एका व्यक्तिस तातडीने शासकीय नोकरी देवून त्यांचे पुर्नवसन करावे ८) वच्छताबाई मानवते या महिलेला मारहाण करणाऱ्या पोलिसांवर तातडीने ३५४, ३०७ अंतर्गत गुन्हे दाखल करून त्यांना निलंबीत करावे ९) वच्छताबाई मानवते यांना सरकारने १० लाख रुपयाची आर्थिक मदत करून त्यांचे पुर्नवसन करावे १००) न्यायालयीन कोठडीत असलेल्या आणि रुग्णालयात उपचार घेत असलेल्या सर्वांचे पुन्हा एकदा न्यायाधिश यांच्या उपस्थितीत मेडीकल करावे ११) पोलिसांनी केलेल्या कोबीन कारवाईत बौध्द वस्तीतील लोकांच्या झालेल्या घरांची नुकसान भरपाई द्यावी, जिल्हा प्रशासनाने त्या सर्व घरांचे तातडीने पंचनामे करून ध्यावे. १२) पोलिसांच्या कोबिंग कारवाईत निर्दोष जखमी झालेल्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी. १३) संविधान शिल्पाची विटंबना करणाऱ्या सोपान पवार याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा. १४) १० डिसेंबर २०२४ रोजी पार पडलेला सकल हिंदू समाज मोर्चातील संयोजक यांची चौकशी करावी. यासोबत त्या मोर्चातील सर्वांची भाषणे तपासून त्याच्यावर कारवाई करावी, अशी मागणी परभणी कोरेगाव भिमा विजय रणस्तंभ सेवा संघ सोलापूर आयु.भागप्पा आर प्रसन्न सोलापूर शहर अध्यक्ष यांनी केले आहे.